दै. रजि. नं. /२०२६

दाखल ता. / /२०२६

Exh. 1/C

समरी क्रि.केस नं. /२०२६

**मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो, पेठवडगांव**

यांचे कोर्टात .....

श्री शिवाजीराजे व्यापारी
नागरी सहकारी पतसंस्था मर्या. तर्फे
श्री. असलम इब्राहीम शिकलगार,
व.व. ५५, धंदा : नोकरी,
रा. पेठवडगांव, ता. हातकणंगले,
जि.कोल्हापूर. } फिर्यादी

Order
Keep for Verification
Sd/-
JMFC Vadgaon
22/05/2026

Assistant Superintendent
Civil Court, Peth Vadgaon.

विरुद्ध

श्री. जालंदर तुकाराम कांबळे,
व.व. सज्ञान, धंदा : व्यापार,
रा.विद्या कॉलनी ( संभाजी नगर ) , बुढे यांचे घरासमोर , पेठ वडगांव,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर. } आरोपी

**भारतीय चलनक्षम दस्तऐवज कायदा**
**१८८१ चे कलम १३८ प्रमाणे फिर्याद....**

**यातील फिर्यादी यांची फिर्याद खालीलप्रमाणे:-**

१) फिर्यादी श्री शिवाजीराजे व्यापारी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. संस्था ही कायदेशीर नोंदणीकृत झालेली संस्था असून सदरची संस्था ही वित्तिय सेवा देत आहे. फिर्यादी संस्थेच्या संचालक मंडळाच्या कायदेशीर सभेच्या ठरावाद्वारे यातील आरोपी हे फिर्यादी संस्थेला कायदेशीर देय असलेल्या रक्कमेची परतफेड करण्यासाठी आरोपीने त्याचे भारतीय स्टेट बँक, शाखा – हातकलंगदा ( HATKALANGDA) , येथील आरोपीचे खाते नं. ३२०६६५३९१७५ या खातेवरील र.रु. ५९,०००/- ( अक्षरी एकोणसाठ हजार रुपये ) इतक्या रक्कमेचा धनादेश नं. ७३७३९५ अनादर झालेनंतर सदर धनादेशाची रक्कम मागणीकरणेसाठी तसेच फिर्याद दाखल करणे करिता, तडजोड करणे, पुरावा देणे, इ., करिता फिर्यादी संस्थेने श्री. असलम इब्राहीम शिकलगार यांना अधिकार दिलेले आहेत.

२) यातील फिर्यादी संस्थेतून यातील आरोपी यांनी दि. १९/१२/२०२४ इ.रोजी र.रु. ५००००/-( अक्षरी पन्नास हजार रुपये ) इतकी रक्कम कर्जाऊ स्वरुपात निर्धारित व्याज दराने विहित वेळेत परत करणेचे अटींवर घेतली होती. आरोपी यांनी

10/5/26
Assistant Superintendent
Civil Court, Peth Vadgaon.

घेतलेल्या कर्जाचा फिर्यादी संस्थेमधील **खाते क्रमांक हा "४/३०४५"** असा असून सदर खातेची येणे रक्कम न भरली गेल्यामुळे दि. ०९/०३/२०२६ इ. रोजी पर्यत एकूण र. रु. ५९,२४९/- ( एकोणसाठ हजार दोनशे एकोणपन्नास रुपये ) इतकी रक्कम आरोपीकडून फिर्यादी संस्थेस येणे बाकी होती व आहे. सदर थकित रक्कमेची मागणी फिर्यादी संस्थेतर्फे यातील आरोपी यांचेकडे केली असता यातील आरोपी यांनी फिर्यादी संस्थेस कायदेशीर देय असलेल्या रक्कमेपोटी आरोपीचे भारतीय स्टेट बँक, शाखा – हातकलंगदा ( HATKALANGDA) , येथील खातेचा र. रु. ५९,०००/- ( अक्षरी एकोणसाठ हजार रुपये ) इतक्या रक्कमेचा दि. १०/०३/२०२६ इ. रोजीचा धनादेश नं. ७३७३९५ हा धनादेश दिला होता व सदर धनादेश देतेवेळी सदर धनादेश नक्की वटेल असे आश्वासन व अभिवचन आरोपी यांनी फिर्यादी संस्थेस दिले होते व आहे.

३) यातील आरोपीने दिलेला धनादेश फिर्यादी संस्थेतर्फे आरोपीचे सांगणेप्रमाणे फिर्यादी संस्थेच्या ABASAHEB PATIL RENDAL SAHAKARI BANK LTD या बँकेमधील खातेवर वटणेसाठी दि. १०/०३/२०२६ इ. भरला असता सदरचा धनादेश दि. १२/०३/२०२६ इ. रोजी **"FUNDS INSUFFICIENT"** या मेमोने न वटता परत आला आहे. यातील आरोपीने फिर्यादी संस्थेला न वटणारा धनादेश देवून फिर्यादी संस्थेचा विश्वासघात केला आहे.

४) वास्तविक यातील आरोपी यांनी फिर्यादी संस्थेला धनादेश देतेवेळेस दिलेली हमी व अभिवचनाप्रमाणे आरोपीच्या खात्यामध्ये धनादेशमध्ये नमूद रक्कमेची पूर्तता करणेची आरोपीवर कायदेशीर व नैतिक जबाबदारी होती व आहे. तथापि, आरोपी यांनी फिर्यादी संस्थेची फसवणूक करणेच्या उद्देशाने आरोपी यांनी फिर्यादी संस्थेला जाणूनबुजून व हेतुपरस्पर न वटणारा धनादेश दिलेला होता व आहे. सदरील प्रमाणे आरोपी यांचे कृत्य संपूर्णतः बेकायदेशीर, अनाधिकाराचे, निगोशिएबल इन्स्टुमेंट अॅक्ट चे कलम १३८ चे तरतुदीविरुध्द व फिर्यादी संस्थेची फसवणूक करणारे व आर्थिक नुकसान करणारे असे होते व आहे.

५) यातील फिर्यादी संस्थेने आरोपी यांना दि. ०१/०४/२०२६ इ. रोजी वकिलांचे मार्फत रजिस्टर नोटीस पाठवून चेक न वटता परत आलेबाबत व चेक प्रमाणेची रक्कम फिर्यादी संस्थेला अदा करणेबाबत आरोपीच्या पत्त्यावर नोटीस पाठविली. सदरची

15/5/26
Assistant Superintendent
Civil Court, Peth Vadgaon.

नोटीस यातील आरोपी यांनी स्विकारली असले बाबतची पोस्टाकडून पोहोच दि. ०६/०४/२०२६ इ. रोजी प्राप्त झालेली आहे. यातील आरोपी यांनी यातील फिर्यादी संस्थेस न वटणारा धनादेश देवून फिर्यादी संस्थेची कायदेशीर देय रक्कम बुडविणेच्या उद्देशाने फिर्यादी संस्थेची घोर फसवणूक केली आहे व त्याद्वारे निगोशिएबल इन्स्टुमेंट ॲक्ट चे कलम १३८ प्रमाणे गुन्हा केलेला आहे. सबब आरोपी विरुध्द प्रस्तुत फिर्याद दाखल करणे भाग झाले आहे.

६) <u>फिर्यादीस कारण :-</u>

यातील आरोपी यांनी फिर्यादी संस्थेला दि. १०/०३/२०२६ इ. रोजीचा फिर्यादी संस्थेची कायदेशीर देय असणारी रक्कमेपोटी धनादेश दिला तेव्हा व तद्नंतर सदरचा धनादेश दि. १२/०३/२०२६ इ.रोजी न वटता परत आला तेव्हा व तद्नंतर फिर्यादी संस्थेने आरोपी यांना दि. ०१/०४/२०२६ इ. रोजी वकिलांमार्फत रजिस्टर नोटीस पाठवून येणे रक्कमेची मागणी केली तेव्हा व तद्नंतर सदरची नोटीस यातील आरोपी यांनी स्विकारली असले बाबतची पोस्टाकडून पोहोच दि. ०६/०४/२०२६ व आजअखेर आरोपी यांनी फिर्यादी संस्थेची कायदेशीर देय रक्कमेची परतफेड केली नसलेने वेळोवेळी प्रस्तुत फिर्यादीस कारण घडले आहे.

७) आरोपी यांनी फिर्यादी यांना दिलेल्या धनादेशाचा तपशिल पुढीलप्रमाणे :-

A) धनादेशाची तारीख :- दि. १०/०३/२०२६

B) धनादेश बैंकेत भरलेली तारीख :- दि. १०/०३/२०२६

C) धनादेश न वटता मेमोसह परत आलेची तारीख :- दि. १२/०३/२०२६

D) धनादेश न वटलेबाबत आरोपीस फिर्यादी यांनी आपले वकिलांचे मार्फत पाठविलेली नोटीसची तारीख :- दि. ०१/०४/२०२६

E) आरोपी यांनी नोटीस स्विकारलेची असलेची पोस्टाकडून सुचनेची तारीख :- दि. ०६/०४/२०२६

८) <u>स्थळसिमा :-</u>

यातील फिर्यादीस कारण मे. कोर्टाचे स्थळसिमेत घडलेने सदरची फिर्याद चालविणेचा मे.कोर्टास हक्क व अधिकार आहे.

Assistant Superintendent
Civil Court, Peth Vadgaon.

९) प्रस्तुत फिर्यादी व्यतिरिक्त आरोपीविरुध्द या धनादेशसंबंधी कोणत्याही कोर्टात दावा अथवा फिर्याद दाखल नाही.

१०) सदरच्या फिर्यादीस योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प लावलेला आहे.

११) <u>सबब फिर्यादीतर्फे विनंती अशी की,</u>

A) फिर्यादीची मे. कोर्टात चौकशी होवून आरोपीस भारतीय चलनक्षम दस्तऐवज कायदा कलम १३८ अन्वये गुन्हा केला असलेने आरोपीस जास्तीत जास्त शासन व दंड करणेत यावा.

B) आरोपीकडून वसूल होणाऱ्या दंडापैकी नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार होवून फिर्यादी यांना बी. एन. एस. एस. कलम ३९५ प्रमाणे नुकसान भरपाई मिळावी.

C) धनादेशाची रक्कम खातेवरील र. रु. ५९,०००/- ( अक्षरी एकोणसाठ हजार रुपये ) व नुकसानीची रक्कम फिर्यादीस मिळणेबाबत योग्य तो आदेश करणेत यावा.

D) न्यायाचे इतर अनुषांगिक हुकुम याच कामी फिर्यादीचे वतीने व्हावेत.

E) जरूर तर फिर्याद दुरुस्तीस परवानगी असावी.

सोबत वकीलपत्र, कागदांची यादी, यादीनुसार कागद व आरोपीकरिता प्रत जोडली आहे.

<u>लेखी पुरावा :-</u>

१) फिर्यादी संस्थेला आरोपी यांनी दिलेला धनादेश.

२) सदरचा धनादेश न वटलेबाबत बैंक मेमो.

३) आरोपी यांना फिर्यादी संस्थेने वकिलांमार्फत पाठविलेली नोटीस व पोस्टाची पोहोच.

<u>तोंडी पुरावा :-</u>

१) फिर्यादी.

Assistant Superintendent,
Civil Court, Peth Vadgaon.

२) संबंधित बँकेतील माहितगार इसम.

३) पोस्टमन.

४) जरूर तर जादा पुरावा करणेस परवानगी असावी.

ठिकाण-पेठ वडगांव

येणे प्रमाणे फिर्याद असे.

दि. १५/०५/२०२६

फिर्यादी
क्लार्क
श्री. शिवाजीराजे व्यापारी नागरी
सह. पत संस्था मर्या. पेठ वडगाव

## ॲफिडेव्हीट

मी यातील फिर्यादी श्री शिवाजीराजे व्यापारी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. तर्फे श्री. असलम इब्राहीम शिकलगार, व.व.५५, धंदा : नोकरी, रा. पेठवडगाव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर, शपथपूर्वक कथन करतो की, वर नमूद फिर्यादीमधील संपूर्ण मजकूर माझे सांगणेप्रमाणे नमूद केला असून तो माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हीट. आज मुक्काम पेठवडगाव

दि. १५/०५/२०२६

ॲफिडेव्हीट करणार यांना मी ओळखतो.

ॲड.सचिन ला.बोभाटे.

ॲफिडेव्हीट करणार
क्लार्क
श्री. शिवाजीराजे व्यापारी नागरी
सह. पत संस्था मर्या. पेठ वडगाव

Assistant Superintendent
Civil Court, Peth Vadgaon.

## प्रतिज्ञा

मी यातील फिर्यादी श्री शिवाजीराजे व्यापारी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. तर्फे श्री. असलम इब्राहीम शिकलगार, व. व. ५५, धंदा : नोकरी, रा. पेठवडगाव, ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर, सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वर नमूद फिर्यादीमधील व ॲफिडेव्हीटमधील संपूर्ण मजकूर माझे सांगणेप्रमाणे नमूद केला असून तो माझे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले प्रतिज्ञा. आज मुक्काम पेठ वडगांव

दि. १५/०५/२०२६

प्रतिज्ञा करणार

क्लार्क

श्री. शिवाजराजे व्यापारी नागरी
सह पत संस्था मर्या· पेठ वडगाव

Solemnly Affirmed before me by
Shri...Aslam.....Ibrahim...Shikalgar
Age..55..of......Peth Vadgaon who is Tal. Hatkanangale
identified by Shri....S. L. Bobhate, Adv.
..............whom I know personally
Dated :- 15/5/26

Assistant Superintendent